**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**नअ/०२२५८३/चौकशी दि.** 3 1 MAR 2023

**विषयः- नगर अभियंता खात्यातील दुय्यम अभियंता (स्थापत्य) व**
**<u>दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पदांच्या सुधारीत अर्हता.</u>**

नगर अभियंता खात्यातील दुय्यम अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी व विद्युत) पदांच्या सुधारित अर्हतांना मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) यांनी दि. १०.०३.२०२३ च्या क्र. अति.आ/शहर/३९२१/डी अन्वये मंजूरी दिलेली आहे.

सर्व खाते प्रमुख/ विभाग अधिकारी यांना कळविण्यात येते की, संबंधित कर्मचारी वर्गाकडून या सुधारित अर्हतांची नोंद करुन घेण्यासाठी हे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रक आपल्या विभागीय कर्मचा-यांना प्रसृत करावे व ते ठळकपणे सूचना फलकावर लावून त्यास जास्तीत जास्त प्रसिध्दी दयावी.

27/3/23

**नगर अभियंता (प्र)**

प्रत:- ............................................................यांना माहितीसाठी कृपया अग्रेषित.

28/3/2023

**सह प्रमुख कर्मचारी अधिकारी**
**नगर अभियंता**

## बृहन्मुंबई महानगरपालिका

### मान. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांनी दि. १०.०३.२०२३ च्या क्र. अति.आ/शहर/३९२१/डी अन्वये मंजूरी दिलेल्या दुय्यम अभियंता (स्थापत्य) पदाच्या सुधारीत अर्हता

**अ) पदोन्नतीने**

दुय्यम अभियंता (स्थापत्य) हे पद खालील अर्हताधारण करीत असलेल्या कर्मचा-यांमधून सेवाज्येष्ठता नि गुणवत्तेनुसार पदोन्नतीने भरण्यात येईल.

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर कार्यरत असणा-या आणि ज्यांची त्या पदावरील अखंडित सेवा चार वर्षापेक्षा कमी नाही.

२) अन्य कारणास्तव सुट मिळण्यास पात्र नसल्यास कर्मचारी 'डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे', 'सी.सी.सी' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात वेळोवेळी आदेश काढून निश्चित केलेली अशी परीक्षा उत्तीर्ण असावा. तथापि, त्याप्रमाणे नसल्यास प्रचलित धोरणानुसार प्रशासनाने संगणक ज्ञानाबाबतचे विहीत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी विशिष्ट कालावधी विहीत केला असल्यास सदर कालावधीत संगणक ज्ञानाचे विहीत प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक राहील.

**खालील नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्याबाबतीत त्यांनी संगणक ज्ञानाची अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.**

अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

ब) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार.

क) इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.
तसेच राज्यशासनाने/बृहन्मुंबई महानगरपालिकेने संगणक ज्ञानाबाबत वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

३) उमेदवार मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता दहावी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

तथापि, त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**ब) सरळसेवेने/निवडीने**

बाहेरुन थेट सरळसेवेने जे उमेदवार खालीलप्रमाणे किमान पात्रता धारण करीत असतील

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदरच नसल्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवारांचे वय ३८ वर्षांपेक्षा व मागासवर्गीय उमेदवारांचे वय ४३ वर्षांपेक्षा जास्त नसावे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदरच असल्यास उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा नाही. तसेच वयाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका/शासनाने वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

२) (अ) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी महाराष्ट्र शासनाने पदवी समतुल्य असल्याचे घोषित केलेली किंवा जे इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकीमधील असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी उत्तीर्ण झाले आहेत किंवा ज्यांनी असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी या सूट देण्यासाठी मान्यता दिलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी प्राप्त केली आहे.

किंवा

अ) जे अशा अभियांत्रिकी संस्थेचे सहयोगी सभासद आहेत की, ज्यांनी (स्थापत्य) अभियांत्रिकीमधील परीक्षा देवून त्या संस्थेचे सभासदत्व इंस्टिटयूट ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेने त्यांच्याशी समकक्ष म्हणून मान्य केले आहे.

ब)दुय्यम अभियंता पदी सरळसेवेने नियुक्तीसाठी अभियांत्रिकी पदवी प्राप्त करणा-या उमेदवारांनी /कर्मचा-यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE)/तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थाना अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिली आहे अशाच शैक्षणिक संस्था/विद्यापीठामधून पदवी प्राप्त करणे आवश्यक आहे.

३) उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहीत केलेली 'एम.एस.सी.आय.टी' ची परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

**खालील नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्याबाबतीत त्यांनी संगणक ज्ञानाची अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.**

अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

ब) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदविका(सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार.

क) इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

तसेच राज्यशासनाने/बृहन्मुंबई महानगरपालिकेने संगणक ज्ञानाबाबत वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

४) उमेदवार मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता दहावी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
तथापि, त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

५)सदर संवर्गातील पदे खालीलप्रमाणे भरण्यात येतील.

i) सदर संवर्गातील ५० टक्के पदे उपरोक्त विहित केलेल्या पदोन्नतीच्या अर्हता संपादन करीत असणा-या कनिष्ठ अभियंत्यांमधून सेवाज्येष्ठता-नि-गुणवत्तेनुसार पदोन्नतीने भरण्यात येतील.

II) ५० टक्के पदे बाहेरुन सरळसेवेने परीक्षेव्दारे भरण्यात येतील.

सही/-२.०२.२०२३
**नगर अभियंता**

सही/- १७.०२.२०२३
**प्रमुख कर्मचारी अधिकारी**

सही/-२२.०२.२०२३
**संचालक (अ.से.व प्र)**

सही/-२३.०२.२०२३
**सह आयुक्त (साप्र)**

सही/-२८.०२.२०२३
**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे)**

सही/-१०.०३.२०२३
**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## मान. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) यांनी दि. १०.०३.२०२३ च्या क्र. अति.आ/शहर/३९२१/डी अन्वये मंजूरी दिलेल्या दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पदाच्या सुधारीत अर्हता

**पदोन्नतीने**

दुय्यम अभियंता (यांत्रिकी व विद्युत) हे पद खालील अर्हताधारण करीत असलेल्या कर्मचा-यांमधून सेवाज्येष्ठता नि गुणवत्तेनुसार पदोन्नतीने भरण्यात येईल.

१)बृहन्मुंबई महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी व विद्युत) या पदावर कार्यरत असणा-या आणि ज्यांची त्या पदावरील अखंडित सेवा चार वर्षापेक्षा कमी नाही.

२) अन्य कारणास्तव सुट मिळण्यास पात्र नसल्यास कर्मचारी 'डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे', 'सी.सी.सी' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा महाराष्ट्र शासनाने या संदर्भात वेळोवेळी आदेश काढून निश्चित केलेली अशी परीक्षा उत्तीर्ण असावा. तथापि, त्याप्रमाणे नसल्यास प्रचलित धोरणानुसार प्रशासनाने संगणक ज्ञानाबाबतचे विहीत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी विशिष्ट कालावधी विहीत केला असल्यास सदर कालावधीतील संगणक ज्ञानाचे विहित प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक राहील.

**खालील नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्याबाबतीत त्यांनी संगणक ज्ञानाची अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.**

अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

ब) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार.

क) इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

तसेच राज्यशासनाने/बृहन्मुंबई महानगरपालिकेने संगणक ज्ञानाबाबत वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

३) उमेदवार मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता दहावी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

तथापि, त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**सरळसेवेने/निवडीने**

बाहेरुन थेट सरळसेवेने जे उमेदवार खालीलप्रमाणे किमान पात्रता धारण करीत असतील

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदरच नसल्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवारांचे वय ३८ वर्षापेक्षा व मागासवर्गीय उमेदवारांचे वय ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत अगोदरच असल्यास उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा नाही. तसेच वयाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका/शासनाने वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

२) (अ) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापिठाची यांत्रिकी व विद्युत किंवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकीमधील पदवी/इलेक्ट्रॉनिक्स/प्रॉडक्शन अभियांत्रिकीमधील पदवी किंवा बॅचलर इन इंजिनिअरींग (इलेक्ट्रॉनिक्स आणि पॉवर इंजिनिअरींग) महाराष्ट्र शासनाने पदवी समतुल्य असल्याचे घोषित केलेली तत्सम अर्हता किंवा जे इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेची यांत्रिकी व विद्युत किंवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकी मधील असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी उत्तीर्ण झाले आहेत किंवा ज्यांनी असोसिएट मेंबरशिप एक्झामिनेशनचे भाग ए व बी या सूट देण्यासाठी मान्यता दिलेल्या यांत्रिकी व विद्युत किंवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकी मधील पदवी प्राप्त केली आहे.

किंवा

जे अशा अभियांत्रिकी संस्थेचे सहयोगी सभासद आहेत की (यांत्रिकी व विद्युत) किंवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकीमधील परिक्षा देवून ज्या संस्थेचे सभासदत्व इंस्टिटयुट ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स (इंडिया) या संस्थेने त्यांच्याशी समकक्ष म्हणून मान्य केले आहे.

ब)दुय्यम अभियंता पदी सरळसेवेने नियुक्तीसाठी अभियांत्रिकी पदवी प्राप्त करणा-या उमेदवारांनी/कर्मचा-यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) /तंत्र शिक्षण संचालनालय (DTE) यांनी ज्या विद्यापीठ किंवा शैक्षणिक संस्थाना अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांसाठी मान्यता दिली आहे अशाच शैक्षणिक संस्था /विद्यापीठामधून पदवी प्राप्त करणे आवश्यक आहे.

३) उमेदवार डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी.चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरीता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहीत केलेली 'एम.एस.सी.आय.टी' ची परीक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे,अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

**खालील नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्याबाबतीत त्यांनी संगणक ज्ञानाची अर्हता परिक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल.**

अ)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.

ब) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदविका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार.

क) इंडियन सर्टिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSE) यांच्या मार्फत मान्यता प्राप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण.
तसेच राज्यशासनाने/बृहन्मुंबई महानगरपालिकेने संगणक ज्ञानाबाबत वेळोवेळी प्रसारीत केलेली परिपत्रके अंमलात येतील.

४) उमेदवार मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता दहावी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परीक्षा (उच्चस्तर/निम्नस्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या निकषानुसार उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
तथापि, त्याप्रमाणे नसल्यास व अन्य कारणास्तव सूट मिळण्यास पात्र नसल्यास महानगरपालिका प्रशासनामार्फत घेण्यात आलेली मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**५)सदर संवर्गातील पदे खालीलप्रमाणे भरण्यात येतील.**

i) सदर संवर्गातील ५० टक्के पदे उपरोक्त विहित केलेल्या पदोन्नतीच्या अर्हता संपादन करीत असणा-या कनिष्ठ अभियंत्यांमधून सेवाज्येष्ठता-नि-गुणवत्तेनुसार पदोन्नतीने भरण्यात येतील.

II) ५० टक्के पदे बाहेरुन सरळसेवेने परीक्षेव्दारे भरण्यात येतील.

२) सदर संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या पदांपैकी १० टक्के पदे इलेक्ट्रॉनिक्स पदवीधारकांमधून भरण्यात येतील (एकुण पदांमध्ये १० टक्क्यापेक्षा जास्त नाही)

सही/-२.०२.२०२३
**नगर अभियंता**

सही/- १७.०२.२०२३
**प्रमुख कर्मचारी अधिकारी**

सही/-२२.०२.२०२३
**संचालक (अ.से.व प्र)**

सही/-२३.०२.२०२३
**सह आयुक्त (साप्र)**

सही/-२८.०२.२०२३
**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे)**

**सही/-१०.०३.२०२३**
**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)**